दि.०८.०५.२०२०

**टिप - पीपीई किट/ एन-९५ मास्क यांच्या उत्पादन व विक्री बाबतची माहिती...**

संदर्भ - १) अधिसूचना, सार्वजनिक आरोग्य विभाग दि.०३.०४.२०२०
२) अधिसूचना, सार्वजनिक आरोग्य विभाग दि.०९.०४.२०२०
३) शासन परिपत्रक, वैदयकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग दि.११.०४.२०२०

संदर्भ क्र.१ च्या अधिसुचनेनुसार PPE Kits व N-95 Mask विकू इच्छित उत्पादक / वितरक / अडते (एजंट) यांनी उत्पादनाचा दर्जा व गुणवत्ता हाफकीन, मुंबई यांच्या कडून प्रमाणित करुन घेतल्याशिवाय विक्री करण्यास प्रतिबंध घातला होता.

सदर अधिसुचनेच्या अनुषंगाने हाफकीन, मुंबई यांनी १२ उत्पादनांना प्रमाणीत करुन संकेतस्थळावर दर्शवलेले आहे. संदर्भ क्र.२ च्या अधिसुचनेनुसार संदर्भ १ ची अधिसुचना रद्द करण्यात आल्याने दि.१०.०४.२०२० पासून हाफकीन, मुंबई यांनी कोणत्याही उत्पादनास प्रमाणीत केलेले नाही.

संदर्भ क्र.३ च्या परिपत्रकात सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या सूचना व साथरोग कायदा १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावलीतील तरतुदीनुसार PPE Kits व N-95 Mask यांचे उत्पादन, वितरण व विक्री या बाबतचे निदेश दिलेले आहेत. हे निदेश सर्व इच्छूक पुरवठादारास लागू राहतील व त्या निदेशाचे पालन करणारे पुरवठादार/उत्पादक यांच्याकडून PPE Kits व N-95 Mask सदर परिपत्रकात नमुद केलेल्या कार्यपद्धतीने संबंधीत प्राधिकार खरेदी करु शकतात.

(डॉ.रा.म.कुंभार)
जनरल मॅनेजर-१,
हाफकीन, मुंबई